दि. ०८ एप्रिल,२०२६

## जाहीर प्रकटन

व्यवस्थापन परिषदेच्या एका सदस्याने, अधिसभेच्या दि. २७ व २८ मार्च, २०२६ रोजीच्या सभेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी यांनी सदर व्यवस्थापन परिषद सदस्य आणि त्यांच्या कुटुंबियांच्या बदनामीचे कटकारस्थान रचल्याचा आरोप करून कुलगुरू यांचेकडून त्यांच्या जीविताला धोका असल्याचे सांगत अधिसभेच्या बैठकीच्या दुस—या दिवशी सभागृहाच्या दारात ठिय्या आंदोलन केले होते. सदर व्यवस्थापन परिषद सदस्याने विद्यापीठाच्या विश्रामगृहातील त्यांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या मुक्कामाचे सी सी टी व्ही फुटेज मिळवून त्याचा गैरवापर झाल्याचाही आरोप केला असून सदर आरोपांच्या अनुषगांने त्यांनी विविध वृत्तपत्रांमध्ये तसेच समाज माध्यमांमध्ये कुलगुरू प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी यांच्या विरोधात तशा अर्थाचे वृत्त प्रसारित केले आहे. तसेच सदर व्यवस्थापन परिषद सदस्याने या अनुषगांने चतु:श्रृंगी पोलिस स्टेशन, पुणे शहर येथे तक्रार दाखल केली आहे.

कुलगुरू प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी यांच्या विरूध्द करण्यात आलेल्या सदर आरोपांमध्ये कोणेतेही तथ्य नाही. विद्यार्थी संघटनेकडून सदर बाबत विद्यापीठास प्राप्त झालेल्या पत्रामध्ये कोणत्याही व्यक्तीच्या नावाचा उल्लेख नसून सी सी टी व्ही फुटेजची मागणीदेखील करण्यात आलेली नाही. तसेच विद्यापीठाच्या संबंधित विभागाकडेदेखील सी सी टी व्ही फुटेज उपलब्ध करून देण्याची मागणी प्राप्त झालेली नाही. तरीदेखील सदर प्रकरणामध्ये गैरसमजातून विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी यांचेविरूध्द चुकीचे व तथ्यहीन आरोप करण्यात आले असून विविध वृत्तपत्रे व समाज माध्यमांमध्ये या अनुषंगाने कुलगुरू यांचेविषयी अत्यंत चुकीच्या पध्दतीने क्लेषदायक आणि बदनामीकारक मजकूर प्रसिध्द करण्यात आला आहे. सबब या सर्व आरोपांचे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी यांचेकडून खंडन करण्यात येत आहे.

सदर प्रकरणातील सत्य समाजास कळणे आवश्यक असल्याने सदर जाहीर प्रकटन प्रसिध्द करण्यात येत आहे.

Registrar
Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
Pune - 7.